**Corporate News:** April 2, 2015

# रतन इंडियाचे अमरावतीमधील ३ युनिट्स ३९ दिवसांच्या विक्रमी कालावधीमध्ये कार्यान्वित

मुंबई । प्रतिनिधी

रतनइंडिया पॉवर लिमिटेडने (पूर्वीचे इंडियाबुल्स पॉवर लिमिटेड) अमरावती औष्णिक उर्जा प्रकल्पाचे ५ वे युनिट सुरु केले आहे. याबरोबरच १३५० I क्षमतेचा अमरावती औष्णिक उर्जा प्रकल्प संपूर्णपणे कार्यान्वित झाला आहे. प्रत्येक युनिटची क्षमता २७० वॅट इतकी आहे. आपले ३ युनिट्स ३९ दिवसांच्या विक्रमी कालावधीमध्ये कार्यान्वित करून रतनइंडियाने भारताच्या उर्जा प्रकल्पाचे बांधकाम आणि उभारणीच्या इतिहासामध्ये एक नवा अध्याय जोडला आहे. या पूर्वी अमरावती उर्जा प्रकल्पाचे युनिट ३ आणि युनिट ४ रतनइंडियाने अनुक्रमे ३ फेब्रुवारी आणि ८ मार्च रोजी सुरु केले.

यामुळे कंपनीचा काम पूर्ण करण्याचा झपाटा प्रदर्शित झाला आहे. रतनइंडियाची संपूर्ण मालकी असलेल्या अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडने अमरावतीच्या उर्जा प्रकल्पामधून उर्जा प्रेषण प्रणाली सुरु केली आहे. या प्रेषण प्रणालीमध्ये अमरावती प्रकल्पापासून अकोला सबस्टेशन पर्यंतच्या १०४ किलोमीटरच्या ४०० किलोवॅटस् क्वाड मूस लाईनचा समावेश आहे.

रतनइंडिया पॉवर लिमिटेडने वलगाव ते अमरावती उर्जा प्रकल्पापर्यंतची रेल्वे लाईनही पूर्ण केली आहे. ही रेल्वे लाईन पूर्ण झाल्यामुळे अमरावती उर्जा प्रकल्पास कोळशाचा थेट पुरवठा होईल. कोल इंडिया लिमिटेडची शाखा असलेल्या साउथ इस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडकडून अखंडित कोळशाचा पुरवठा होणार आहे.

**Aaple Mahnagar**